# भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानाचा अंगिकार आवश्यक

## – डॉ. व्ही.बी. ककडे

**कोल्हापूर, ता. २४(प्रतिनिधी)–**

जगाला महाविनाशापासून वाचवायचे असेल तर भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानाचाच अंगिकार आपल्याला करावा लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही.बी. ककडे यांनी केले आहे.

भगवान महावीर जयंतीच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाच्या शिव वार्ता संवाद' या कार्यक्रमांतर्गत महावीर की महाविनाश?' या विषयावर डॉ. ककडे यांची विशेष मुलाखत जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी घेतली. या मुलाखतीमध्ये ते बोलत होते.

डॉ. ककडे म्हणाले, नैसर्गिक साधन संपत्तीची अपरिमित हानी, सत्तासंघर्ष, संपत्तीचे केंद्रीकरण आदी अनेक कारणांनी जग एका मोठ्या विनाशाकडे निघाले आहे. या विनाशापासून जगाला वाचवायचे असेल तर भगवान महावीरांच्या सत्य, अहिंसा, अस्तेय आणि अपरिग्रह या मूल्यांचा अंगिकार प्रत्येकाने व्यक्तीगत पातळीवर करायचास हवा. भगवान महावीरांनी कोणत्याही देवाची अगर व्यक्तीची पूजा केली नाही, तर त्यांनी सदैव या मानवी मूल्यांचीच उपासना केली. हीच तत्त्वे त्यांनी जगाला प्रदान केली. त्याचप्रमाणे सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारित्र्य या रत्नत्रयीचा अंगिकार हा सार्वत्रिक पातळीवर होणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या उपक्रमांबद्दल माहिती देताना डॉ. ककडे म्हणाले, जैन धर्मातील २४ तीर्थंकर आणि त्यांच्या योगदानाची, शिकवणीची किमान माहिती लोकांना व्हावी, यासाठी अध्यासनामार्फत २४ पुस्तकांची ग्रंथमाला प्रकाशित करण्यात आली. तिला सर्वदूर उत्तम प्रतिसाद लाभला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या प्रेरणेतून अध्यासनाच्या सल्लागार समितीची फेररचना केली असून त्यामध्ये अजैन असलेल्या मान्यवरांचाही समावेश केला आहे. अध्यासनामार्फत जैनॉलॉजीचे पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविले जातात. त्यांनाही उत्तम प्रतिसाद आहे. त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन आर्थिक सहाय्य करावे, असे आवाहनही डॉ. ककडे यांनी या प्रसंगी केले.

लोकमत

# विद्यार्थ्यांसाठीची 'हेल्पलाईन' दोन दिवसांत अद्ययावत करणार

## शिवाजी विद्यापीठ : शिक्षण संचालकांच्या निर्देशानुसार कार्यवाही

**लोकमत इफेक्ट**

लोकमत न्यूज नेटवर्क

१७,००० ऑफलाईन परीक्षार्थी



१८,३०० ऑनलाईन परीक्षार्थी

### २८ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा

विद्यापीठाने हिवाळी सत्रातील विविध २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुक्रवारी ऑनलाईन झाल्या. त्यासाठी २९,०७४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८,५३९ जणांनी परीक्षा दिली, तर ५३५ जण गैरहजर राहिले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून सध्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येत आहेत. त्यातील तांत्रिक अडचणीबाबत विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या हेल्पलाईन सेवेतील मोबाईल आणि दूरध्वनी क्रमांक दोन दिवसात अद्यावत करणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी शुक्रवारी दिली. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या १७ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑफलाईन पर्याय निवडला आहे. त्यांची परीक्षा घेण्याबाबत उच्च शिक्षण संचालकांच्या निर्देशानुसार कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

परीक्षा मंडळाने विद्यार्थ्यांसाठी विविध २५ मोबाईल, दूरध्वनी क्रमांक असलेली हेल्पलाईन सुरू केली आहे. कराडमधील बी. कॉम. भाग तीन अभ्यासक्रमाची परीक्षा देणाऱ्या काही विद्यार्थ्यांना गुरूवारी त्यांची ऑनलाईन परीक्षा सुरू होण्यापूर्वी लॉगीन करण्याची तांत्रिक अडचण आली. त्यावर त्यांनी या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यातील काही नंबर लागत नव्हते. काही बंद, तर काही सातत्याने व्यस्त होते. दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधला असता परीक्षा रद्द झाल्याचे उत्तर देण्यात आले. विद्यार्थ्यांना झालेला हा त्रास 'लोकमत'ने ऑनलाईन आवृत्तीमध्ये मांडला. त्याची दखल घेत परीक्षा मंडळाच्या संचालक पळसे यांनी या प्रकाराची चौकशी केली. त्यांनी हेल्पलाईन मधील क्रमांक दोन दिवसात अद्यावत केले जातील. चुकीचे उत्तर देणाऱ्या विद्यापीठातील व्यक्तीचा शोध घेतला जात असल्याचे सांगितले. पारंपरिक अभ्यासक्रमांसह पदविका पदव्युत्तर पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षांच्या परीक्षा संलग्नित महाविद्यालय, अधिविभागांनी दि. १५ मे पर्यंत घ्याव्यात. या परीक्षांच्या सुधारित वेळापत्रकाची माहिती विद्यार्थ्यांना देण्याची सूचना महाविद्यालय, अधिविभागांनी केली असल्याचे पळसे यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 3 Apr 24, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविणारे व्यक्तिमत्त्व

## डॉ. अरुण निगवेकर यांचे कोल्हापूरच्या मातीशी नाते : आयुष्याचा देदीप्यमान आलेख प्रेरणादायी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** करवीर तालुक्यातील निगवे खालसा येथील सामान्य कुटुंबातील मुलगा ते जागतिक दर्जाचा शिक्षक, संशोधक आणि काही दशके जगाच्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल घडवून आणणारी व्यक्ती असाच डॉ. अरुण निगवेकर यांच्या आयुष्याचा देदीप्यमान आलेख आहे. त्यांच्या निधनाने त्यांच्या कोल्हापूरशी जोडलेल्या आठवणी पुन्हा जाग्या झाला. कोल्हापूरच्या मातीला अभिमान वाटावा असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

निगवेकर कुटुंबीय शेती करायचे; परंतु त्यांच्या आजोबांना आपल्या मुलांनी निगवे सोडून इतरत्र जावे आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे, असे वाटे. निगवेकर यांचे वडील त्याकाळी इंजनिअरिंगचे पदवीधर होते. साधारणत: १९४० ते १९५० पर्यंतचा हा काळ होता. निगवेकर कुटुंबीय त्याकाळी शाहूपुरी चौथ्या गल्लीमध्ये राहायचे. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूलमध्ये झाले. त्यांच्या वडिलांना इंग्रजी शिक्षणाबद्दल कमालीची ओढ होती. त्याकाळी ते मुलांना इंग्रजी वृत्तपत्र आणून वाचायला देत असत. गॅसबत्तीभोवती चार भावंडांसोबत निगवेकर अभ्यास करून शिकले. राजाराम महाविद्यालयातून ते पदवीधर झाले. तिथे विज्ञान विभागातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दोन वर्षे पुढील शिक्षणासाठी दरमहा ६० रुपये शिष्यवृत्ती कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याकडून दिली जात असे. त्या आर्थिक मदतीतून ते पुणे विद्यापीठातून भौतिकशास्त्रात एम.एस्सी. झाले. राजाराम महाविद्यालयातील इंग्रजीचे भाषातज्ज्ञ प्रा. डॉ. व्ही. के. गोकाक, ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर व ज्येष्ठ साहित्यिक ना. सी. फडके यांचा निगवेकर यांच्या जीवनावर मोठा प्रभाव राहिला. त्यांनी शिक्षण हेच जीवनाचे आव्हान मानले. शिक्षक होणे हे त्यांना नेहमीच आव्हानात्मक वाटले म्हणूनच त्यांनी हे क्षेत्र उत्साहाने निवडले. त्यांना पदवीला ५८.५० टक्के गुण होते. छत्रपती घराण्याने शिष्यवृत्ती दिल्यानेच आपल्याला पुणे येथील शिक्षणाची कवाडे उघडली आणि त्यातूनच पुढे जगभरातील संधीची कवाडे खुली झाली, अशी त्यांची भावना होती. त्यांनी उत्तम संशोधन केले. शिक्षण क्षेत्रात सर्वोच्चस्थानी असलेल्या 'युनेस्को' या संस्थेशीही ते अनेक वर्षे जोडले होते. डॉ. निगवेकर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान हे देशासाठी मैलाचा दगड ठरावा इतके मोलाचे होते. शिक्षण क्षेत्रात पाच दशके विविध बदल घडविणारी व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. शिक्षणाचा दर्जा आणि संख्यात्मक सुधारणा यावर त्यांनी अनेक वर्षे काम केले.



**शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा दीक्षान्त समारंभ १ फेब्रुवारी २००३ रोजी झाला. या समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरुण निगवेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी तत्कालीन कुलगुरू डॉ. एम.जी. ताकवले, प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, आदी उपस्थित होते.**

माझे काका डॉ. अरुण निगवेकर यांचे बी. एस्सी.पर्यंतचे शिक्षण कोल्हापूरमध्ये, तर पदव्युत्तर शिक्षण पुणे येथे झाले. तेथून ते परदेशात गेले, तरी कोल्हापूरशी त्यांची नाळ तुटली नव्हती. यूजीसीची आणि उच्च शिक्षणाच्या मूल्यमापनासाठीची अग्रणी संस्था 'नॅक'चे ते संस्थापक-अध्यक्ष असले तरी कुटुंबातील प्रत्येकाच्या करिअरबद्दल त्यांना आस्था होती. माझे वडील वसंत आणि काका मुकुंद निगवेकर दोघेही साहित्यिक, त्यामुळे ते कोल्हापुरात आले की आम्हाला साहित्यावरील चर्चेची मेजवानी मिळत असे. वडील आणि काकांच्या बालकुमार साहित्य सभेबद्दल अरुणकाकांना अतीव आत्मीयता होती. त्या सभेच्या सर्व कार्यक्रमांत त्यांची उपस्थिती असे. कोल्हापुरातील विविध संस्थांनी आयोजित केलेल्या त्यांच्या व्याख्यानांचा लाभ घेण्यासाठी आम्हा सर्व कुटुंबीयांना ते आवर्जून निमंत्रण देत. माझ्या सांगीतिक शिक्षणातील प्रगतीचे त्यांना खूप कौतुक होते. ते मला मार्गदर्शन करीत. त्यांच्या निधनामुळे आमच्या निगवेकर परिवाराचे भूषण हरपले आहे.

**- डॉ. अंजली निगवेकर**, संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

### विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे

डॉ. निगवेकर यांचे शिवाजी विद्यापीठाशी अत्यंत स्नेहपूर्ण संबंध होते. १ फेब्रुवारी २००३ रोजी विद्यापीठाच्या ३९ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहिले होते. विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीमध्ये ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्यासमवेत डॉ. निगवेकरदेखील होते. या समितीच्या पहिल्या बैठकीत त्यांनी या विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याचे सांगत देणगीही जाहीर केली होती.

### संशोधनासाठी 'नेटवर्क' उपलब्ध करून पाठबळ

दीक्षांत समारंभाच्या भाषणामध्ये डॉ. निगवेकर यांनी शिवाजी विद्यापीठात 'व्हीसॅट-बी' बसविला जाईल. संदेश दळणवळणासाठी पहिल्या टप्प्यात १२८ इतकी बँड विड्थ उपलब्ध करून दिली जाईल, असे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी विद्यापीठातील संशोधनाकरिता नेटवर्क उपलब्ध करून देत पाठबळ दिले.

### 'निर्भय व्हा' आत्मकथन

डॉ. निगवेकर यांचे आत्मकथन 'निर्भय व्हा! इतिहास तुमच्या प्रतीक्षेत आहे.' या पुस्तकात आहे. 'Be Bold, History is waiting for You' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा 'निर्भय व्हा' हा मराठी अनुवाद आहे. त्याचे प्रकाशन कोल्हापुरातील सिंधू प्रकाशनने केले आहे.

# २९ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या हिवाळी परीक्षेंतर्गत शुक्रवारी विविध अभ्यासक्रमांची सुमारे २९ हजार ७४ पैकी २८ हजार ५३९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा सुरु आहेत.

# पदवी, डिप्लोमा परीक्षा १५ मेपर्यंत ऑनलाईन होणार

**कोल्हापूर :** कोरोनामुळे उद्‌भवलेली गंभीर परिस्थिती व नवीन शासन निर्देशानुसार महाविद्यालयांमार्फत दूरशिक्षण अभ्यासक्रमासहित घेण्यात येणाऱ्या पदवी अभ्यास (पारंपरिक) प्रथम वर्ष परीक्षा व डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्स, आदी उर्वरित सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने १५ मेपर्यंत घेण्यात याव्यात, असे परिपत्रक शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने संलग्नित महाविद्यालये, अधिविभागांना काढले आहे. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यासाठी येणारा खर्च महाविद्यालयांकडे यापूर्वीच निश्चित करून दिलेल्या परीक्षा शुल्काच्या ७५ टक्के रकमेतून करावा. परीक्षांचे सुधारित वेळापत्रक परीक्षार्थींच्या निदर्शनास आणून द्यावे. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी, असे म्हटले आहे.

# डॉ. अरुण निगवेकर द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ : डॉ. शिर्के

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

ज्येष्ठ पदार्थवैज्ञानिक डॉ. अरुण निगवेकर यांच्या निधनामुळे देशाचा द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

डॉ. निगवेकर पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. देशाच्या विविध शैक्षणिक समित्यांवर काम करून धोरणात्मक दिशा देण्याचे काम त्यांनी केले. बेंगलोर येथील 'नॅक'च्या पायाभरणी व उभारणीत त्यांचे अतुलनीय योगदान आहे. ते 'नॅक'चे पहिले संस्थापक अध्यक्ष होते. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी त्यांचा 'भारताच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे जनक' अशा शब्दांत गौरव केला होता. शिवाजी विद्यापीठाशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते. २००३ मध्ये विद्यापीठाच्या ३९ व्या दीक्षान्त समारंभात ते प्रमुख पाहुणे होते.

## निगवे खालसा गावावर शोककळा

डॉ. निगवेकर यांचे ४ थी पर्यंतचे शिक्षण विद्यामंदिर निगवे खालसा येथे झाले. त्यांची गावात २५ एकर जमीन होती व कै. डॉ. टिकारे जेथे राहत होते ते त्यांचे गावातील मूळ घर आहे. ते इ. ४ थी नंतर शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. त्यांचे मूळ आडनाव कुलकर्णी होते. मात्र, गावाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी निगवेकर हे नाव त्यांनी मुद्दामच लावले.